SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004 MAHARASHTRA
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९००० संलग्नता टी-२ विभाग दूरध्वनी -०२३१ - २६०९०९१संचालक,बी.सी.यु.डी. कार्यालय, दूरध्वनी : (थेट) ०२३१ - २६०९०७०
Estd : 1962
NAAC 'A++' Grade
Acceredited by NAAAC (2021)
With CGPA3.52

जा.क्र. संलग्नता/टी-२/परिपत्रक/ दि. 07 MAY 2022
No 0 0 0 6 4

# परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**विषय:-** शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता संलग्नीकरणाचे नूतनीकरण/नैसर्गिक विस्ताराच्या प्रस्तावांची ऑनलाईन छाननी करताना स्वयंमुल्यांकन अहवालामध्ये अपूर्ण असणारी कागदपत्रे तात्काळ ( विद्यापीठ संलग्नीकरण पोर्टलवरती ऑनलाईन अपलोड करणे तसेच ऑफलाईन हार्डकॉपी स्वरूपात) सादर करण्याबाबत...

**संदर्भ:-** जा.क्र.संलग्नता टी-२/परिपत्रक/०००४६,दि.१२/०४/२०२२ रोजीचे संलग्नता टी-२ चे परिपत्रक.

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषय संदर्भाकित परिपत्रकास अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी संलग्नीकरणाचे नूतनीकरण/नैसर्गिक विस्तारा करिता सादर केलेल्या प्रस्तावासंदर्भात प्रपत्र अ, ब व क (स्वयंमुल्यांकन अहवाल) ऑनलाईन सादर केले आहेत.

सदर अहवालांची ऑनलाईन छाननी करताना आवश्यक ती कागदपत्रे/जोडपत्रे अपलोड केली नसल्याचे छाननी समितीच्या निदर्शनास आले आहे. याअनुषंगाने आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, सर्व महाविद्यालयांनी संलग्नीकरणाचे नूतनीकरण/नैसर्गिक विस्ताराकरिता सादर केलेल्या ऑनलाईन प्रपत्र अ, ब व क मध्ये योग्य त्या मुद्यास योग्य ती कागदपत्रे **दि. ९/०५/२०२२ अखेर** अपलोड करावीत. काही महाविद्यालयांनी अद्यापी संलग्नीकरणाचे नूतनीकरण/नैसर्गिक विस्ताराकरिता ऑनलाईन स्वयंमुल्यांकन (प्रपत्र अ, ब व क) भरलेले नाहीत अशा महाविद्यालययांनी सदर माहिती त्वरीत भरावी तसेच पूर्वी अपूर्ण/चुकीची कागदपत्रे अपलोड केलेल्या महाविद्यालयांनी अ, ब व क फॉर्म तसेच संदर्भीय **कागदपत्रांची हार्डकॉपी** व **सीडी** (पीडीफ स्वरूपात) **समक्ष/खास दुतामार्फत दि. ९/०५/२०२२ रोजी दुपारी १२ वाजेपर्यत रूम नं. १२२ मध्ये** पोहोच करावीत.

आपणास कळविण्यात येते की, संलग्नीकरणाच्या नुतनीकरणासंदर्भात उपरोक्त प्रमाणे स्वयंमुल्यांकन अहवालाची कागदपत्रे पूर्तता न केल्यास उद्‌भवणाऱ्या अडचणीस संबंधित महाविद्यालय सर्वस्वी जबाबदार राहील याची कृपया नोंद घ्यावी.

आदेशान्वये

श्री. विलास एस सोयम
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

H:\january 2022\Circular 2019.docx